MHJN080011232023

**<u>निशाणी क्र.०५ खाली आदेश</u>**

(पारीत दिनांक १०/०४/२०२४)

प्रस्तुत अर्ज वादींनी न्यायालयीन आयुक्त नेमणुक होणेकरीता केलेला आहे.

२) वादींनी असे कथन केले की, वादींनी मौजा नागोबाचीवाडी, ता. घनसावंगी, जि. जालना येथील गट क्र.४४ मधील १४ हे. ४० आर पैकी ०४ हे. ८३ आर जमीनीच्या चतु:र्सिमा खालीलप्रमाणे –

पुर्वेस – प्रतिवादी क्र.१ ते ४ यांचे कब्जातील जमीन,

पश्चिमेस – प्रतिवादी क्र.५ व ६ यांचे कब्जातील जमीन,

दक्षिणेस – राजाटाकळी–गुंज कच्चा पांदन रस्ता व नाला आणि

उत्तरेस – प्रतिवादी क्र.७ व ४ यांचे कब्जातील जमीन.

३) वादींच्या कथनानुसार त्यांच्या शेतजमीनीच्या पुर्व–पश्चिम व उत्तर बाजुने १७ गुंठे क्षेत्रावर प्रतिवादींनी अतिक्रमण केलेले आहे. ते अतिक्रमण काढणेसाठी व त्याचा ताबा मिळणेसाठी दावा दाखल केला आहे. प्रतिवादींचा वादींच्या शेतजमीनीशी कोणताही कायदेशीर हक्क नाही, परंतु ते त्यांच्या शेतजमीनीच्या चतुःसिमेचे लगतचे कब्जेदार आहेत. प्रतिवादींचा शेतजमीनीशी कोणत्याही प्रकारे कायदेशीर हक्क नाही. वादींच्या गैरउपस्थितीमध्ये प्रतिवादी आपसात संगनमत करुन वादींच्या शेतजमीनीवर तिन्ही बाजुने

सामाईक बांध फोडुन बेकायदेशीरपणे १७ गुंठे क्षेत्रावर अतिक्रमण केले आहे. वादींनी अतिक्रमण निश्चीत करण्यासाठी मोजणी होवुन मिळावी याकरीता भुमिअभिलेख कार्यालय, घनसावंगी यांना विनंती केली. परंतु सदर कार्यालयाने न्यायालयाचा आदेश आवश्यक असल्याचे कारण देवुन मोजणी करण्यास नकार दिला. प्रतिवादींनी वादींच्या शेतजमीनीवर अतिक्रमण केले आहे. करीता भुमिअभिलेख कार्यालय, घनसावंगी यांची न्यायालयीन आयुक्त म्हणुन नेमनुक व्हावी, अशी विनंती वादींनी केली.

४) प्रतिवादी क्र.१, ४, ५ व ६ यांना पुरेपुर संधी देवुन देखील त्यांनी अर्जाचे म्हणणे दाखल केले नाही. प्रतिवादी क्र.२, ३ व ७ यांच्या विरोधात दावा एकतर्फा चालविण्यात आला.

५) अर्जाचे अवलोकन केले. प्रस्तुतचा दावा हा अतिक्रमणीत जमीनीचा ताबा मिळण्याबाबत दाखल केलेला आहे. वादींनी दाखल केलेल्या गट क्र.४४ च्या ७/१२ उता–याचे अवलोकन केले असता, त्यावर वादींचे व प्रतिवादी क्र.५ व ६ यांचे नाव दिसुन येत आहे. वादींनी गट क्र.४४ मधील अतिक्रमणीत क्षेत्र निश्चित करणेसाठी न्यायालयीन आयुक्त यांची नियुक्तीची विनंती केली आहे.

६) सदर बाब लक्षात घेता, न्यायालयीन आयुक्ताची नियुक्ती केल्यास निश्चितच दाव्याच्या परिणामकारक निकालासाठी व उभयपक्षातील वादाचे संपूर्ण निराकरण करण्यासाठी मदत होईल. वादींतर्फे वादी क्र.१ चा पुरावा देखील झालेला आहे व प्रतिवादींतर्फे त्याचा उलटतपास घेण्यात आलेला नाही. तसेच सदर न्यायालयीन

आयुक्तची मागणी ही पुरावा गोळा करण्यासाठी केलेली दिसुन येत नाही. करीता, सदरचा अर्ज मंजुर होण्यास पात्र आहे. म्हणून खालील प्रमाणे आदेश पारित करण्यात येत आहे.

**आदेश**

१. तालुका निरीक्षक भुमिअभिलेख कार्यालय, घनसावंगी ता. घनसावंगी, जि. जालना यांना सदर प्रकरणात न्यायालयीन आयुक्त म्हणुन नियुक्त करण्यात येत आहे.

२. न्यायालयीन आयुक्ताने मौजे नागोबाचीवाडी, ता. घनसावंगी, जि. जालना येथील गट क्र.४४ व प्रतिवादींच्या शेतजमीनींची आणि आवश्यकता भासल्यास लगतच्या शेतजमीनीची मोजणी भूमापन संहिते अन्वये करावी व मोजणी नकाशा तयार करुन सविस्तर मोजणी अहवाल नकाशासह न्यायालयात दिनांक १३/०६/२०२४ पावेतो सादर करावा.

३. मोजणीसाठी आवश्यक दस्तऐवज पुर्तता उभयपक्षांनी तात्काळ करावी.

४. न्यायालयीन आयुक्ताचा आवश्यक तो खर्च वादीने सोसावा व तो खर्च भूमी अभिलेख कार्यालय, घनसावंगी येथे भरावा.

५. न्यायालयीन आयुक्त नियुक्तीची पत्र देण्यात यावे.

DISTRICT COURTS MAHARASHTRA

सत्यमेव जयते

Digitally signed by SACHIN BHAGWAT SHIRSATH
Date: 2024.04.10 16:26:27 +0530

दिनांक १०/०४/२०२४

**(स. भा. शिरसाठ)**
दिवाणी न्यायाधीश (क.स्तर),
घनसावंगी.

नियमित दिवाणी दावा क्र.१२८/२०२३
भानुदास व ईतर वि. किशोर व ईतर

**प्रमाणपत्र**

प्रमाणित करण्यात येते की, पी.डी.एफ. फाईल मधील शब्द न शब्द मुळ निकालपत्र प्रमाणे आहे.

लघुलेखकाचे नाव : ए. आर. गडदे
न्यायालयाचे नांव : दिवाणी न्यायालय (क.स्तर) घनसावंगी
दिनांक : १०/०४/२०२४

सही/-
ए. आर. गडदे
(लघुलेखक ग्रेड-३)